मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दिनांक ११ जानेवारी २०२४ । पान १

# मोशी शिवरस्ता ते महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे काम सुरु!

## परिसरातील नागरिकांमध्ये समाधान

**मनीषा थोरात पिसाळ**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
मोशी शिवरस्ता ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंतच्या रस्त्याचे उद्घाटन २१ नोव्हेंबर रोजी करण्यात आले होते. अनेक महिन्यांपासून रखडलेल्या या रस्त्याच्या कामाला अखेर गती मिळाली असून, प्रत्यक्षात कामकाज सुरु झाले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पावसाळ्यात या ठिकाणी कच्चा रस्ता असल्याने बालाजीविश्व सोसायटीसमोर पाण्याचे तळे साचले जात होते. दुचाकी, चारचाकी जाण्यास समस्या येत होत्या. या परिसरात मोठ-मोठ्या सोसायट्या आहेत. रस्ता कच्चा असल्याने नागरिकांना, वाहनचालकांना समस्यांचा सामना करावा लागत होता. या रस्त्याची प्रतिक्षा संपली असून, लवकरच या रस्त्याचे काम पूर्ण होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.





११ मार्च २०२२ मध्ये निविदा काढली होती. निविदाप्रक्रियेमध्ये काही तांत्रिक अडचणी राहिल्या होत्या. या अडचणी आमदार महेश लांडगे यांच्या कानावर घातल्या. या अडचणीबाबत अधिकाऱ्यांसमवेत आयुक्तांसोबत बैठक झाली. काही जागामालकांचे अ.ब. पत्र भरून घेऊन महापालिकेला जागा ताब्यात देण्यास मदत केली आहे. ग्रीनझोनचा मुद्दा या रस्त्याबाबत येत होता. मात्र हा रस्ता पुणे-नाशिक महामार्गाला जोडणे आवश्यक होते. मात्र रस्त्याची जागा ग्रीनझोनची असल्याने शेतकऱ्यांना मोबदला मिळणार नव्हता. या सर्व समस्यांवर मार्ग काढण्यासाठी नगररचना विभाग, आयुक्त शेखर सिंह, आमदार महेश लांडगे यांची बैठक झाली. शेतकऱ्यांना मोबदला मिळावा यासाठी ठराव पास केला. हे काम अंतिम टप्प्यात आहे. या सर्व अडचणी सोडवून अखेर रस्त्याच्या कामास सुरुवात झाली. वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत या रस्त्यामुळे होणार आहे.

–सारिका बोऱ्हाडे, माजी नगरसेविका



पावसाळ्यात या रस्त्यावर सोसायट्यांसमोर पाण्याचे तळे साचले जात होते. आम्ही साचलेले पाणी काढून दिले आहे. रखडलेला रस्ता लवकरात-लवकर व्हावा अशी मागणी अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहाराद्वारे केली होती. अखेर या रस्त्याचे काम सुरु झाले. त्यामुळे देहू-आळंदी रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि शिवरस्त्यावरील वाहतूक कोंडी सुटण्यास काही प्रमाणात मदत होणार आहे. –वसंत बोराटे, माजी नगरसेवक



आमदार महेश दादा लांडगे यांच्याकडे पत्रव्यवहार दऊन पाठपुरावा केला.त्यानंतर आमदारांनी प्रशासनासोबत बैठक लावली. तसेच शेतकऱ्यांना विश्वास घेऊन हा प्रश्न मार्गी लावला. तीस मीटरच्या रस्त्याचे काम अनेक दिवसांपासून रखडले होते. या रस्त्यांमुळे वाहतूक कोंडीची समस्या मिटणार आहे.

– निखील बोऱ्हाडे

या रस्त्याच्या कामासाठी सर्व सोसायटीधारकांनी मागणी केली होती. त्यानुसार एका वर्षामध्ये काम पूर्ण होणार असल्याने नागरिकांना रस्ता वापरण्यात येणार आहे. सध्या सत्तर टक्के जागा ताब्यात आली असन, उर्वरीत जागा लवकरच ताब्यात येईल.

–देवन्ना गट्टूवार
(कार्यकारी अभियंता स्थापत्य क प्रभाग)

# अयोध्येतून आलेल्या मंगल अक्षता व निमंत्रणाचे घरोघरी केले वाटप

## भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी घरोघरी जाऊन केले वाटप

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
अयोध्येतील प्रभू श्री रामचंद्र यांच्या मूर्तीला चरणस्पर्श करून रामलला प्रतिष्ठानकडून आलेल्या पवित्र मंगल अक्षता आणि प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकांचे पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी घरोघरी जाऊन वाटप केले.

हिंदू धर्मामध्ये तब्बल ५०० वर्षानंतर प्रभू श्रीरामांच्या मंदिर स्थापनेचा सुवर्ण दिवस उगवला आहे. येत्या २२ जानेवारीला पिंपरी-चिंचवडमधील बांधवांनी आपल्या नजीकच्या कोणत्याही मंदिरात जाऊन पवित्र अक्षता अर्पण काराव्यात. तसेच घरोघरी श्रीराम ज्योती लावून हा



दिवस दिवाळीप्रमाणे साजरा करावा, असे आवाहन जगताप यांनी नागरिकांना केले. पिंपळेगुरव, सांगवी, संत तुकारामनगर, कासारवाडीसह अन्य भागात घरोघरी जाऊन (झळाअॅळ) पवित्र मंगल अक्षता व निमंत्रण पत्रिकांचे वाटप केले. यावेळी सांगवीतील स्वयंसेवक परेश नेमाडे, प्रदीप बडे, संजय लोहकरे, किशोर खोत, विशाल सांगळे, संतोष कुलकर्णी, सागर पवार, जतीन गाजरे, सुधाकर वाचपे, शरद पवार, संत तुकारामनगरमधील स्वयंसेवक ओंकार शिंदे, चंद्रशेखर, विशाल मासुळकर, राजू चौधरी, संदीप जाधव, सतीश नागरगोजे, आशिष नागरगोजे, राहुल खाडे, सर्वेश देसाई, गोविंदा गायकवाड, रोनित काटे, राहुल सणस, सागर सणस, प्रतीक पवार, महेश देशपांडे, ललित देसाई, सागर गायकवाड, वसंत शेवडे, मंगेश येरूनकर, साहिल शहा आदी उपस्थित होते.

# शिंदे गट हीच खरी शिवसेना..!

## ‘या’ मुद्द्यांच्या आधारे विधानसभा अध्यक्षांनी केला निवाडा

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**



गेल्या काही महिन्यांपासून अवघ्या राज्यच नाही तर देशाचं लक्ष लागून असलेल्या आमदार अपात्र प्रकरणावर आज विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकाल दिला.शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे काही आमदारांसह भाजपसोबत गेले आणि मुख्यमंत्री झाले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे गटाकडून पक्ष आणि पक्ष चिन्हाबाबतची लढाई सुरु झाली होती. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीनंतर न्यायालयाने आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्षांनी निकाल द्यावा असे आदेश दिले होते.त्यानुसार आज विधानसभा अध्यक्षांनी निकालाचे वाचन केले आणि शिंदे गट हीच मूळ शिवसेना असल्याचे जाहीर केले. ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का मानला जात आहे. २०१८ ची शिवसेनेची पद रचना पक्षाच्या घटनेनुसार नव्हती. पक्षप्रमुख नव्हे तर राष्ट्रीय कार्यकारणी सर्वोच्च असल्याचे आढळून आले पक्षप्रमुख एकटेच निर्णय घेऊ शकत नाहीत. शिवसेना पक्षप्रमुख कोणालाही पदावरून काढू शकत नाहीत. त्यामुळे एकनाथ शिंदेंची हकालपट्टी मान्य करता येणार नाही असं स्पष्ट निरीक्षण यावेळी अध्यक्षांनी नोंदवलं.

तसेच शिंदे गट हीच मूळ शिवसेना असल्याचं देखील अध्यक्षांनी यावेळी शिक्कामोर्तब केलं.पक्ष शिंदेंचा असल्यामुळे त्यांच्या आमदारांना अपात्र करता येणार नाही. तसेच गोगावलेची प्रतोद म्हणून निवड योग्य आहे म्हणून त्यांचा व्हीप देखील योग्य असलयाचे यावेळी अध्यक्ष नार्वेकर यांनी सांगितलं. आज (दि.१०) दुपारी ४.३० वाजल्यानंतर महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी निकालाचे वाचन करण्यास सुरूवात केली.यावेळी अध्यक्षांनी सुप्रीम कोर्टाचे आभार मानले. त्यासोबत सहकार्य केल्याबद्दल अध्यक्षांनी दोन्ही गटाच्या वकिलांचे देखील आभार मानले.

### अध्यक्षांनी मांडलेले महत्वाचे मुद्दे

» घटना नेतृत्व आणि विधिमंडळ बहुमत,पक्ष ठरवताना हे महत्वाचे घटक असल्याचे यावेळी अध्यक्ष नार्वेकरांनी म्हंटले. शिवसेनेची २०१८ ची घटना विचारात घेतली.विधिमंडळातील बहुमत हा मुद्दा देखील विचारात घेतला.योगेश कदम यांची साक्ष महत्वाचीदोन्ही गटांनी पक्षाच्या वेगवेगळ्या घटना दिल्या.

२०१८ ला शिवसेना पक्ष घटनेत जो बदल केला तो चुकीचाउद्धव ठाकरेंनी दिलेल्या घटनेवर तारीख नाही. निवडणूक आयोगाकडे असलेल्या घटनेचा आधार घेत आहे.ठाकरे गटाने केलेली घटनादुरुस्ती नियमबाह्य

२०२३ ला निवडणूक आयोगाने पक्षाची जी घटना दिली तीच ग्राह्य धरतो उलट तपासणीला आले नाहीत म्हणून ठाकरे गटाचं प्रतिज्ञापत्र अमान्य २०१८ मध्ये पक्षाची अंतर्गत निवडणूक झालेली नाही मी ती घटनादुरुस्ती नाही. शिवसेनेची १९९९ ची घटना ग्राह्य धरणार खरी शिवसेना ठरवण्याचा अधिकार अध्यक्षांनाच २१ जून २०२२ ला शिवसेनेत दोन गट पडले २०१८ ची शिवसेनेची पद रचना पक्षाच्या घटनेनुसार नव्हती पक्षप्रमुख नव्हे तर राष्ट्रीय कार्यकारणी सर्वोच्च पक्षप्रमुख एकटेच निर्णय घेऊ शकत नाहीत शिवसेना पक्षप्रमुख कोणालाही पदावरून काढू शकत नाहीत. एकनाथ शिंदेंची हकालपट्टी मान्य करता येणार नाही. पक्षप्रमुखाला सर्वोच्च अधिकार देणं लोकशाहीला घातक शिंदे गट हीच मूळ शिवसेना शिंदेंच्या आमदारांना अपात्र करता येणार नाहीपक्ष शिंदेंचा असल्यामुळे त्यांचे आमदार पात्रगोगावलेची प्रतोद म्हणून निवड योग्य.. म्हणून त्यांचा व्हीप योग्य

# शिवसेना मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील यांचा मोहननगर शाखेत सन्मान!

## श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला सन्मान

**पुणे।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या मावळ लोकसभा संघटक पदी संजोग वाघेरे पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल शिवसेना शाखा मोहननगर येथे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका मीनलताई विशाल यादव यांच्या संकल्पनेतून देशातील विविध खेळातील सर्वोच्च खेळाडू माहितीपटाचा, गौरव देशाचा क्रीडा विश्वाचा या कॅलेंडरचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख सचिन भोसले, शिवसेना शहर संघटक विशाल यादव, विभाग प्रमुख शशिकांत पाडाळे, नागेश नामदे, सोमनाथ अलंकार, मधुसूदन आंबुसकर, ज्येष्ठ शिवसैनिक मोहन धापटे, काशिद काका, रघुनाथ कदम, माजी पीएसआय काळे साहेब, मिलिंद दवणे, संजय पारसकर, युवा सेनेचे अनुज महाजन, प्रथमेश पाटील, कुशल बहिरवाडे, स्वप्निल येवले, स्वप्निल वाघेरे सर्व शिवसैनिक व युवा सैनिक उपस्थित होते.

# पुणे महानगरपालिकेत नोकरीची संधी

## महापालिकेत ११३ जुनियर इंजिनियर पदासाठी भरती



### १६ जानेवारीपासून भरतीसाठी अर्ज

**» या भरती प्रक्रियेमध्ये ११३ जागांपैकी काही जागा आरक्षित करून ठेवण्यात आले आहेत. यामध्ये १३ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. उरलेल्या १०० जागा या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ठेवण्यात आले आहेत. १६ जानेवारी २०२४ पासून तुम्ही या भरतीसाठी अर्ज करू शकतात. नुकतीच पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून या भरती प्रक्रियेची माहिती देण्यात आली. २०२३ म्हणजेच गेल्या वर्षी १३५ जूनियर इंजिनियर्स साठी ही भरती प्रक्रिया महानगरपालिकेने राबवली होती. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराला तीन वर्ष अनुभवाची अट घालण्यात आली होती.**


**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** तुम्ही इंजिनिअर असाल आणि नोकरीच्या शोधात असाल तर ही महत्त्वाची बातमी तुमच्यासाठी आहे. पुणे महानगरपालिकेत आजपासूनच मेगा भरती सुरू झालेली आहे. या मेगा भरतीची माहिती पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून देण्यात आली. तुम्हाल सुद्धा या भरतीमध्ये नाव नोंदवायचं असेल तर तुम्ही वेळ न घालवता आजच अर्ज भरा. ही भरती नेमकी कशाची आहे किती जागांसाठी आहे आणि यात किती पगार असणार आहे याबद्दल आता आपण सविस्तर जाणून घेऊया. पुणे महानगरपालिकेने वर्षाच्या सुरुवातीलाच एक आनंदाची बातमी सगळ्यांसाठी दिली आहे. नोकरीसाठी धडपडत असणारे आणि मेगा भरतीची वाट पाहणारे यांच्यासाठी ही भरती आता लवकरच सुरू केली जाणार आहे. पुणे महानगरपालिकेने ही बातमी देताच अनेक इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरायला घेतले आहेत. तुम्हाला देखील या मेगा भरतीमध्ये तुमचं नाव नोंदवायचं असेल तर वेळ न घालवता आजच हा अर्ज भरून घ्या. या भरती प्रक्रियेच्या अधिसूचनासुद्धा आत्ताच प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या मेगा भरती मध्ये नोकरीचे ठिकाण पुणेच असेल. पुणे महानगरपालिकेमध्ये आता तुम्हाला देखील नोकरी करण्याची संधी निर्माण झाली आहे. एकूण ११३ पदांसाठी ही मेगा भरती होणार आहे. ११३ जुनियर इंजिनियर पदासाठी ही भरती राबवली जाणार आहे.ही मेगा भरती पुणे महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागाकडून राबवण्यात येणार आहे. या भरती प्रक्रियेसाठी शिक्षणाची ही अट ठेवण्यात आली आहे. अर्जदाराचे इंजीनियरिंग मधून शिक्षण पूर्ण झाले असले पाहिजे. गेल्या वर्षी झालेल्या भरतीमध्ये तीन वर्षाचा अनुभव असणं गरजेचं होतं. मात्र यावर्षी पुणे महानगरपालिकेने अशी कोणतीही अट घातलेली नाही आहे त्यामुळे आत्ताच शिक्षण पूर्ण झालेला अभियंता सुद्धा या मेघा भरतीमध्ये आपलं नाव नोंदवू शकतो. या भरती प्रक्रियेमध्ये ११३ जागांपैकी काही जागा आरक्षित करून ठेवण्यात आले आहेत. यामध्ये १३ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत. उरलेल्या १०० जागा या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ठेवण्यात आले आहेत. १६ जानेवारी २०२४ पासून तुम्ही या भरतीसाठी अर्ज करू शकतात. नुकतीच पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनाकडून या भरती प्रक्रियेची माहिती देण्यात आली. २०२३ म्हणजेच गेल्या वर्षी १३५ जूनियर इंजिनियर्स साठी ही भरती प्रक्रिया महानगरपालिकेने राबवली होती. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराला तीन वर्ष अनुभवाची अट घालण्यात आली होती. २०२३ मध्ये १२५०० उमेदवारांनी या मेगा भरती मध्ये आपला सहभाग दाखवला. गेल्यावर्षीचा अंदाज बांधता यावर्षीच्या भरती प्रक्रियेमध्ये देखील उमेदवारांकडून मोठा प्रतिसाद मिळेल अशी आशा वर्तवली जात आहे. पुणे महानगरपालिकेने वर्षाच्या सुरुवातीलाच एक आनंदाची बातमी सगळ्यांसाठी दिली आहे. नोकरीसाठी धडपडत असणारे आणि मेगा भरतीची वाट पाहणारे यांच्यासाठी ही भरती आता लवकरच सुरू केली जाणार आहे. पुणे महानगरपालिकेने ही बातमी देताच अनेक इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज भरायला घेतले आहेत. तुम्हाला देखील या मेगा भरतीमध्ये तुमचं नाव नोंदवायचं असेल तर वेळ न घालवता आजच हा अर्ज भरून घ्या. या भरती प्रक्रियेच्या अधिसूचनासुद्धा आत्ताच प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या मेगा भरती मध्ये नोकरीचे ठिकाण पुणेच असेल.

# शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे नको

## शिक्षण विभागाच्या कामांपैकी अनेक कामे अशैक्षणिक : विजय कोंबे

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या अशैक्षणिक कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्यानुसार राज्यातील शिक्षकांना शिक्षण विभाग सोडून अन्य विभागांची कोणतीही कामे देऊ नयेत, शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांच्या कामासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी, अशा महत्त्वाच्या शिफारशी अहवालाद्वारे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता या अहवालासंदर्भात शिक्षण विभाग काय धोरण निश्चित करणार, ही बाब महत्त्वाची ठरणार आहे.

शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही. राष्ट्रीय दशवार्षिक जनगणना, निवडणूक आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळीच शिक्षकांना कामे देता येतात. मात्र शिक्षकांना वर्गात शिकवणे किंवा शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त जवळपास दिडशे कामे लावली जात असल्याचा आक्षेप आहे.



त्यात प्रशासनाने दिलेली विविध कामे, अहवाल, सर्वेक्षणे, अभियाने आदींचा समावेश आहे. मात्र या अशैक्षणिक कामांमुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत असल्याचे सांगत शिक्षक संघटनांकडून या कामांना विरोध करण्यात आला आहे. त्यामुळेच नवसाक्षरता अभियानातील निरक्षरांच्या सर्वेक्षणावरही शिक्षक संघटनांनी बहिष्कार घातला आहे. परिणामी या अभियानाचे काम पूर्ण क्षमतेने सुरू झालेले नाही. या पार्श्वभूमीवर शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांबाबत शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती. नुकत्याच झालेल्या विधिमंडळ अधिवेशनापूर्वी समितीने आपला अहवाल सादर केला. निवडणूक आणि जनगणना ही कामे सोडून शिक्षकांना शिक्षण विभाग वगळता अन्य विभागांची कामे देऊ नयेत. शैक्षणिकदृष्ट्या आवश्यक असलेली कामे शिक्षकांना करावी लागतील. त्यात शिक्षण विभागाच्या अखत्यारितील कामे उदाहरणार्थ युडायस नोंदणी, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड, शालेय पोषण आहार अशी कामे करावी लागतील. शालेय पोषण आहाराच्या अभिलेख्यांसाठी स्वतंत्र यंत्रणा असावी अशा काही महत्त्वाच्या शिफारशी असल्याची माहिती सूत्रांनी दिली.शिक्षण हक्क कायद्यातील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे लावण्यास परवानगी नाही.

# वार्षिक विकास आराखड्यात ऊर्जा, पर्यटन, रोजगारावर भर

## पुणे जिल्ह्याच्या ११२९ कोटींच्या आराखड्याला पालकमंत्र्यांची मंजुरी

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे जिल्ह्याच्या आगामी आर्थिक वर्षाच्या वार्षिक विकास आराखड्यात पारंपारिक व अपारंपरिक ऊर्जा विकास, पर्यटन विकास, महिला व बालकांचे सशक्तीकरण, कौशल्यपूर्ण रोजगार निर्मिती, गतिमान प्रशासन, शिक्षण, आरोग्य व रस्ते विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. यानुसार जिल्ह्यातील संभाव्य विकास कामांच्या १ हजार १२८ कोटी ८४ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीने बुधवारी (ता.१०) मंजुरी दिली आहे. या प्रारूप वार्षिक आराखड्यात वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत ९४८ कोटी रुपये, अनुसूचित जाती योजनेंतर्गत १३५ कोटी रुपये आणि आदिवासी उपयोजनेअंतर्गत ४५ कोटी ८४ लाख रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत या आराखड्याला मंजुरी देण्यात आली.



या बैठकीला राज्याचे सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे हे सर्व दूरदृष्य प्रणालीद्वारे, पालकमंत्री पवार यांच्या समिती कक्षातून आमदार दिलीप मोहिते पाटील, सुनील शेळके, अतुल बेनके, मंत्रालयातून सामान्य प्रशासन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव नितीन गद्रे, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आणि जिल्ह्यातील विविध ठिकाणांहून आमदार उमा खापरे, दत्तात्रेय भरणे, अशोक पवार, ॲड.राहुल कुल, सिद्धार्थ शिरोळे, अश्विनी जगताप, जिल्हा नियोजन समिती सदस्य आणि विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. दरम्यान, पुणे जिल्ह्याच्या चालू आर्थिक वर्षातील (सन २०२३-२४) जिल्हा वार्षिक योजनेतील सर्वसाधारण योजनेअंतर्गत आजअखेरपर्यंत (ता.१०) एकूण ५९० कोटी रुपयांचा निधी खर्च झाला आहे. निधी खर्चाचे हे प्रमाण वार्षिक आराखड्यातील एकूण प्रस्तावित निधीच्या प्रमाणात ८३.७२ टक्के इतके आहे. यामुळे जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी खर्चात पुणे जिल्हा प्रशासकीय मान्यता व वितरित निधीच्या बाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर आला आहे. अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत १२.८० टक्के आणि आदिवासी उपयोजनेअंतर्गत ५२.९५ टक्के निधी खर्च झाला आहे. येत्या मार्च अखेरपर्यंत १०० टक्के निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी यावेळी दिली.

# भाजप कार्यकर्त्यांना अजितदादा करणार मार्गदर्शन?

## महायुतीचा पहिला मेळावा रविवारी!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** महा युतीतील वाटाघाटी मध्ये भाजपला पुण्याचे पालकमंत्री पद अजित पवार यांना द्यावे लागले. त्यामुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता असताना आता आगामी लोकसभा निवडणूक पार्श्वभूमीवर भाजपच्या पदाधिकाऱ्यांना अजित पवार यांचे मार्गदर्शन ऐकून त्यानुसार कामे करावी लागणार असल्याची शक्यता आहे. रविवारी पुण्यात महायुतीच्या पुणे शहर व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा होत असून यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजित पवार हेच प्रमुख मार्गदर्शक असण्याची शक्यता आहे. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाची महायुती होऊन सहा महिने होत आले तरीही अद्याप एकही संयुक्त मेळावा झाला नव्हता. आता महायुतीच्या जिल्हानिहाय सभा महाराष्ट्रभर १४ जानेवारी रोजी आयोजित करण्याचे नियोजन आहे. त्याअंतर्गत आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याचा पहिला मेळावा रविवारी (ता. १४) पुणे



शहरात म्हात्रे पुलाजवळ होणार आहे. यामध्ये पालकमंत्री अजित पवार हे पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्याची शक्यता आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहर व जिल्ह्याचा पहिला मेळावा रविवारी (ता. १४) पुण्यात म्हात्रे पुलाजवळ होणार आहे. या मेळाव्याच्या तयारीसाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आज पार पडली. यावेळी तिन्ही पक्षांचे शहराध्यक्ष व जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते. भाजपने लोकसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे, त्यांच्या कार्यकर्त्यांनी बूथसह नमो ॲपद्वारे कामाला लावले आहे. पण या तिन्ही पक्षात समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यभर १४ जानेवारी रोजी मेळावे होणार आहेत. पुणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा म्हात्रे पूल डीपी रस्त्यावरील शुभारंभ मंगल कार्यालय येथे दुपारी चार वाजता होणार आहे. याच्या नियोजनाची बैठक आज झाली. मेळाव्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार या तिघांपैकी एकजण उपस्थित राहणार आहेत, असे शहराध्यक्ष धीरज घाटे, दीपक मानकर यांनी सांगितले. दरम्यान, या महायुतीच्या मेळाव्याला प्रत्येक जिल्ह्यात तेथील पालकमंत्री मार्गदर्शन करतील असे महायुतीच्या नियोजनानुसार ठरलेले आहे. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद भाजपने अजित पवार यांना दिले आहे. त्यामुळे महायुतीचा पहिला मेळावा होत असताना शिंदे व फडणवीस हे न आल्यास अजित पवार गट, शिवसेनेसह भाजप कार्यकर्त्यांना दादांचे मार्गदर्शन ऐकून त्यानुसार पुढील काम करावे लागणार आहे.